# राशिभविष्य - एप्रिल, २०२०.

**दादा दामले ( dadadamle@gmail.com )**

=================================================================

**(१) मेष -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. सतत वाद, भांडणे होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, मनाविरुद्ध घटना घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागणे, त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. बुधामुळे हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, मानहानी होणे, मित्रद्रोह होणे, कुसंगतीची बाधा होणे अशापैकी घटना घडून अस्वस्थ व्हाल. जपा. या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा होणे संभवते. त्यामुळे
कोणाचाही धाक वा दडपण सहन होणार नाही. या राशीची लहान मुले तर अत्यंत हूड, खोडकर होण्याची शक्यता आहे. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या धनस्थानी स्वराशीत असलेला शुक्र वैवाहिक व कौटुंबिक सुखसमाधान देईल. शिवाय धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या राहूमुळे हातून काही तरी कर्तृत्व सिद्ध करणारी घटना घडेल. मन मोठे व उत्साहजनक होईल. पण काही कारणाने बंधसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या केतुमुळे ढोंगी, धूर्त असे आचरण होणे संभवते. शिवाय या केतुमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी शनि - मंगळ -गुरु असे तीन ग्रह आहेत. शनि -गुरु चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना अनुकुल होतील. पण मंगळामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. नोकरीत कामाचा असह्य ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. त्यामुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तो विचार मनातून काढून टाकावा. व सहनशील बनून काळ व्यतीत करावा. प्रतिकुल काळ कायम असत नाही. नंतर अनुकुल काळ येईलच. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब होणे, असे काही घडल्यास गहिरे नैराश्य येईल. त्यात भर म्हणून कुमार्गी मित्रांचा सहवास लाभला तर नुकसानीत भरच पडेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. त्यामुळे मनस्वास्थ्य लाभेल. दररोज स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते या महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. बुध ग्रहही अनुकुल असल्यामुळे सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. शिवाय नवे मित्र मिळण्याची शक्यताही आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध दोन्ही ग्रह प्रतिकुल होतील व त्यामुळे अपयश, मानहानी, दु:ख, अस्वस्थ मनस्थिती, पराजय, अनारोग्य, आर्थिक चिंता अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल व त्यामुळे गहिरे नैराश्य येण्याची शक्यता आहे. जपा. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, काही मंडळींना वाईट प्रसंगाला तर काही मंडळींना अगदी जिवावरच्या प्रसंगालाही तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. शिवाय अकारण शत्रुत्व निर्माण होणेही संभवते. जपा. पण याच राशीच्या मालकीचा शुक्र ग्रह अनुकुल

असल्याने काही प्रमाणात कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुख मिळू शकेल. त्यामुळे प्रतिकुल काळ सुसह्य होईल. या राशीच्या धनस्थानी असलेला राहू आर्थिक चिंता निर्माण करील व विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला केतु सुद्धा राहूला साथ देईल व वैवाहिक आणि कौटुंबिक जीवनात कलह निर्माण करील. जपा. त्याच्यामुळे काही मंडळींना त्वचेचा आजार तर काही मंडळींना रक्तविकार किंवा मुख- दंत रोगाचा आजार त्रस्त करील. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी मंगळ -शनि व गुरु असे तीन ग्रह आहेत. गुरु-शनि अनुकुल असल्याने चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना व आध्यात्मिक उपासना करत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. प्रवासाचे योग येतील. पण शक्यतो प्रवास करू नका. कारण मंगळामुळे प्रवासात मनस्ताप व मानहानी होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेला नेपच्यून मनोवैज्ञानिक आणि द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनकूल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा व रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी राहू असून सप्तम स्थानी केतू आहे. दोन्हीही ग्रह मानसिक आरोग्य बिघडवणारे व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणणारे आहेत. राहूमुळे सतत अपमानकारक घटना घडणे संभवते. तसेच या राहूमुळे अनारोग्य होऊन वातविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. ज्यांची कोर्ट प्रकरणे आहेत त्यांनी अपयश टाळण्यासाठी पुढील तारीख मागून घ्यावी. मनस्थिती अस्थिर राहील. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत शनि -मंगळ -गुरु असे तीन ग्रह आहेत. पैकी शनि - मंगळ हे दोन्ही शत्रु ग्रह अनारोग्यकारक असून काही मंडळींना एखादा वातविकाराचा मोठा आजार होणे संभवते. मनस्थिती अस्वस्थ व अशांत राहील. अपेक्षाभंग होणे संभवते. असमाधानकारक घटना घडतील. काही मंडळींना मंगळामुळे मूळव्याधीसारखा एखादा उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील.

अपघात भय असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. हाडमोड होणे संभवते. वीज, पाणी यांच्यापासून धोका असल्याने विजेची उपकरणे सावधानतेने व काळजीपूर्वक हाताळा. जलप्रवास करू नका व खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. पण जन्मकुंडलीत गुरु ग्रह अनुकुल असल्यास काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहे. तो शुभ असून ज्यांना अध्यात्माची मनापासून आवड आहे अशांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे सहज शक्य होईल. या राशीच्या काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. मोठ्या, प्रतिष्ठित अधिकारी मंडळींच्या ओळखी होतील. काही भायवान मंडळींना मानाचे स्थान वा एखादे उच्च पदही मिळू शकेल. स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. सर्व प्रकारचे आरोग्य सुधारेल. बुधाच्या अनुकुलतेमुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनवृद्धी होईल. नवे मित्र मिळतील. लाभस्थानी असलेला हर्षल मात्र प्रतिकुल असल्यामुळे वरील सर्व घटनांबाबत अनिश्चितता निर्माण होईल. मित्राशी भांडणे होतील. पण अर्थलाभ मात्र होण्याची शक्यता आहे.

या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या स्वराशीतील शुक्र ग्रहामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर या राशीच्या मंडळींना श्रीशिव शंकराची उपासना व श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज स्नान झाल्यावर “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे व “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या केतूमुळे आरोग्य उत्तम राहील, उच्च आचारविचार राहतील, नोकरीव्यवसायात अपेक्षित सहकार्य लाभेल, अंगी असलेल्या गुणांमुळे प्रसिद्धी लाभेल. तसेच या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या राहूमुळे आर्थिक लाभ होतील, हितशत्रूंपासून रक्षण होईल, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल, पण हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. पैकी शनि ग्रह फारसा प्रतिकुल नसला व गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या राशीच्या विवाहेच्छूना विवाहयोग येण्याची शक्यता असली तरी शनीमुळे विवाहयोग लांबणीवर पडण्याची शक्यता दिसते. येथील गुरु ग्रहामुळे प्रवासाचे योग येतील, नवे स्नेहसंबंध जुळून येतील, जुने प्रेमसंबंध असतील तर ते घट्ट होतील. अर्थलाभ होईल. पण मंगळामुळे वैवाहिक जीवनातील सुखात पति पत्नीत होणारे वाद, भांडणे, अन्य कटकटी, कोणा एकाचे अनारोग्य अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार -व्यवसाय आहे अशांनी संशय, गैरसमज, मतभेद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे जलप्रवास करू नका. तसेच खोल पाण्यात पोहावयास जाण्याचा प्रयत्न करू नका. त्याचप्रमाणे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या भाग्यस्थानी असलेले रवि -बुध महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असल्यामुळे नोकरीत त्रास, मानहानी, मानसिक ताण, भांडणे, भय, निराशा, अनारोग्य, घरी वडील मंडळींचा विरोध अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि - बुध या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर परिस्थिती सुधारेल आणि सर्व काही मनासारखे घडेल. या राशीच्या दशम स्थानी आरंभापासूनच असलेला हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी स्वतः:च्या वृषभ राशीत असलेला शुक्र सर्व सुख, ऐषाराम, धनलाभ देण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे व “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या लाभस्थानी राहू व पंचम स्थानी केतू आहे. ज्यांना नोकरीव्यवसायात - अधिकार पद आहे त्यांना आपल्या अधिकारपदाचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याची दुर्बुद्धी होईल. पण त्यांनी मन व बुद्धीवर नियंत्रण ठेवून हा दुर्विचार मनातून काढून टाकावा. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. शिवाय या राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी असलेलया केतूमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे संभवते. शिवाय काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. पण ज्यांना आध्यात्मिक उपासनेत रस आहे अशांना व गूढ संशोधनात रुचि आहे अशांना हा केतू अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. हे तिन्ही ग्रह त्यांना अनुकुल

नोकरी-व्यवसाय असणारांना पूरक होतील. पण मंगळ -शनि अनारोग्यकारक असून त्यांच्यामुळे काही मंडळींना उष्णताविकाराचे आजार - ताप येणे, अंगावर फोड येणे -अशापैकी आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना रक्तविकार किंवा हृदयविकार अशापैकी एखादा आजारही होणे संभवते. त्याशिवाय अर्थहानी होणे, अपप्रचाराचा त्रास होणे, चोरी होणे अशापैकी घटना घडणेही संभवते. जपा. शनीमुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, गैरसमजुतीने वाद, भांडणे होणे, वातविकाराचा आजार होणे संभवते. पण याच स्थानी आरोग्यरक्षक गुरु ग्रह असल्याने होणारे आजार गंभीर स्वरूप धारण करणार नाहीत, असे वाटते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या रवि -बुध ग्रहांपैकी रवि ग्रह प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. त्यामुळे अनारोग्य होणे, संततिसुखात बाधा येणे, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, रोग प्रतिकारशक्ती कमी होणे, भावनेच्या भरात भरकटत जाणे अशापैकी काही घडणे संभवते. जपा. पण महिन्याच्या पूर्वार्धात बुध ग्रह अनुकुल असल्याने काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि - बुध या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर दोन्ही ग्रह प्रतिकुलच असल्याचा अनुभव येईल. पण भाग्यस्थानीच हर्षलही असल्याने शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. पण अन्य नोकरी-व्यवसाय असणारांना काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या दशम स्थानी स्वराशीत शुक्र ग्रह आहे. तो फारसा अनुकुल नाही. त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडथळे येणे, मनस्तापदायक घटना घडणे संभवते. पण केवळ कलेसाठी कला या दृष्टीने उपयोग केल्यास थोडा अनुकुल होऊ शकेल. श्रद्धा असेल तर भगवान विष्णु नारायणाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. दररोज स्नान झाल्यावर “विष्णु सहस्रनामा”चे पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या दशम स्थानी राहू असून चतुर्थ स्थानी केतु आहे. पैकी या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत हा राहू अनुकुल व लाभदायक होईल. काही कर्तबगार मंडळींना हाती घेतलेल्या कामात यश मिळून त्यांपैकी कोणास अधिकार पद , कोणाला मानसन्मान अशापैकी काही मिळण्याची शक्यता आहे. पण या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या केतूमुळे या राशीच्या मंडळींना कसली तरी चिंता त्रस्त करील. विषभय आहे. जपा. घरात कोणाशी न पटल्याने गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. पैकी मंगळ ग्रह संततिसुखाचे दृष्टीने प्रतिकुल होणे संभवते. मुलांपैकी कोणाची आचरणविषयक समस्या, तर कोणाचे आजारपण अशापैकी घटना त्रस्त करतील. काही मंडळींना स्थावरविषयक समस्या त्रस्त .करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. शनि ग्रहामुळे स्वभाव स्वार्थी, संशयी, व्यवहारी असा होण्याची शक्यता दिसते. पण गुरु-शनि चिकित्सक बौद्धिक ग्रह शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल होतील. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे या राशीच्या मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना किंवा एखादी काल्पनिक चिंता त्रस्त करील. त्याशिवाय फसवणूक झाल्याचा त्रास होणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याशिवाय अनारोग्याचा त्रास होणे संभवते. विशेष करून पोटविकार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल; व त्यामुळे भांडणे, वाद होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात बुध ग्रह अनुकुल होणार असला तरी अष्टम स्थानी

असलेला हर्षल अपघातकारक होणे संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला स्वराशीतील शुक्र पूर्णपणे अनुकुल होईल, व त्यामुळे काही मंडळींना गुरुकृपा तर काही मंडळींना थोरकृपा प्राप्त होणे संभवते. काही भाग्यवान मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी असे काही मिळू शकेल. त्याशिवाय सुखसमाधान, ऐषाराम मिळणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल . दररोज स्नान करताना “ओम गं गणपतये नम : “ मंत्राचा २१ वेळा जप करा. तसेच स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीचा भाग्यस्थानी राहू असून तृतीय स्थानी केतू आहे हे दोन्ही ग्रह कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. अशा परिस्थितीत मन शांत व स्थिर राहावे यासाठी आध्यात्मिक उपासनेस हा केतू अनुकुल होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. हे तिन्ही ग्रह कुटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. मंगळामुळे कुटुंबात कटकटी, वाद, भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. जपा. शनिमुळे गहिरे नैराश्य येणे संभवते. माता असेल तर तिच्या अनारोग्याची चिंता अस्वस्थ करील. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो नीच राशीत असल्याने त्याचा फारसा उपयोग होणार नाही. उलट नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यताच अधिक आहे. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल व नैराश्य येईल. पण हा नेपच्यून आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती देईल. गूढ संशोधन कार्यास मात्र हा नेपच्यून अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले रवि -बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होतील. ते दोन्ही ग्रह दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी नोकरी- व्यवसायात जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर शारीरिक दृष्ट्या अनारोग्यकारक व मानसिक दृष्ट्या मनस्तापकारक होणार आहेत. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. बुधामुळे भांडणे, दु:ख, वियोग अशापैकी कारणांनी मनस्थिती अस्वस्थ राहील. जपा. शिवाय या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत हर्षल असल्यामुळे जीवनसाथी/संगिनीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, भांडणे, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहि त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या अष्टम स्थानी स्वराशीत असलेलला शुक्र अनुकुल असल्याने या राशीच्या काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक धनलाभ होणे संभवते. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होऊ शकेल. काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या धनस्थानी केतू असल्याने या राशीच्या मंडळींना आर्थिक चिंता त्रस्त करतील. तसेच कौटुंबिक सुखात व संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम

स्थानी बुध ग्रहाच्या मालकीच्या राशीत राहू आहे. राहू-बुध मित्र ग्रह असल्याने येथील राहू आनंदी, उत्साही परिस्थिती निर्माण करतो. जन्मकुंडलीत योग असतील तर येथील राहू अचानक धनलाभ देऊ शकेल. पण जीवनसाथी/ संगिनी भांडखोर, असल्यास वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. हे तिन्ही ग्रह अनुकुल आहेत. मंगळामुळे धैर्य, हिम्मत, महत्वाकांक्षा वाढेल, कर्तबगारी सिद्ध होईल. पण इजा होण्याची शक्यता असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. शनि ग्रहामुळे काही मंडळींना नवी अपेक्षित अशी उत्तम नोकरी मिळेल किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त
करीतसे दिसते. गुरु ग्रह बौद्धिक व लेखन कार्यास अनुकुल असला तरी तो त्याच्या नीच राशीत आहे. त्यामुळे अगदी अल्प प्रमाणात या राशीच्या लेखकांना व बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून आहे. तो कौटुंबिक सुखाचे दृष्टीने व गृहसौख्याचे दृष्टीने थोडी बाधा निर्माण करीतसे दिसते. जपा. महिन्याच्या प्रथमार्धात या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत रवि - बुध आहेत. हे दोन्ही ग्रह संततिसुखाचे दृष्टीने प्रतिकुल होतील. तसेच प्रिय जनांपासून दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ व निराश होईल. नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा जाच सहन करावा लागेल. त्यामुळे स्वतः:चे आरोग्यही बिघडण्याची शक्यता आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास पूरक होतील. मन:शांती लाभेल. हितशत्रू पराभूत होतील. पण ज्यांना हृदयविकार आहे त्यांनी मन व बुद्धी स्थिर, शांत व प्रसन्न राखण्याचा प्रयत्न करावा. बुधामुळे महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात कार्यसिद्धी होईल व धनलाभ होणेही संभवते. या षष्ठ स्थानी प्रथमपासून हर्षल आहेच. तो अति खोल विचारी संशोधक बुद्धीचा ग्रह आहे. पण तो षष्ठ या आरोग्यस्थानी आहे. त्यामुळे अति विचार करू नका. मेंदूला आवश्यक तेवढी विश्रांती मिळू दे. नपेक्षा काही मंडळींना डोकेदुखीचा तर काहींना मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी स्वराशीत शुक्र ग्रह आहे. त्यामुळे विवाहेच्छूंना विवाहयोग संभवतो. ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते दृढ होतील. नवे स्नेहसंबंध जुळून येणेही शक्य आहे. वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळेल. ज्या गर्भवती स्त्रियांचा प्रसूतिकाळ या महिन्यात आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. पतिपत्नीपैकी कोणी कलाकार असेल तर अधिकच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर नियमितपणे “ श्रीगणेश अथर्वशीर्षा’चे पठण करा व रात्री झोपी जाण्यापूर्वी “ श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या प्रथम स्थानी असलेला केतू अनुकुल असून सप्तम स्थानी असलेला राहू मात्र प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. केतू सुखकारक असला तरी तो वाहनसंबंधी धोकादायक आहे. सबब रस्त्याने चालत जाताना अथवा वाहन चालवत असताना सतत सावधानतेने व नियमांचे पालन करूनच चालवा. या केतूमुळे या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. पण राहूमुळे मनस्थिती विकृत होईल व मनात कपटी विचार थैमान घालतील. तसेच वाममार्ग धन प्राप्त करण्याची ओढ निर्माण होईल. पण तो विचार प्रयत्नपूर्वक मनातून काढून टाका. त्याशिवाय या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची दाट शक्यता आहे. या राशीच्या धनस्थानी मकर राशीत मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. मंगळामुळे आर्थिक देणे देण्यासंबंधीची जबाबदारी कशी पूर्ण होणार याची चिंता त्रस्त करील.

देणे द्यावेच लागेल; पण येणे कधी येईल याची खात्री देता येणार नाही. त्याशिवाय शारीरिक उष्णता भडकून डोळे, मान, घसा, दाढा यांचे अनारोग्य त्रस्त करील. जपा. शनि ग्रहामुळे आर्थिक चिंतेशिवाय नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे, कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, कोर्टप्रकरणे असतील तर त्यांचा त्रास होणे संभवते. जपा. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो नीच राशीत दुर्बळ असल्याने बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अल्प प्रमाणातच अनुकुल होईल. या राशीच्या तृतीय स्थानी नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील बनेल. पण हा नेपच्यून अध्यात्म व गूढ संशोधन कार्यास अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय या नेपच्यूनमुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत रवि -बुध आहेत. हा रवि ग्रह संपूर्ण महिनाभराच्या काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे अनारोग्य, आर्थिक चिंता, दु:ख, कौटुंबिक त्रास, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, नोकरीत वरिष्ठांचा जाच, प्रिय जनांपासून होणारा दुरावा, संततीपैकी कोणाचे आजारपण अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. . त्यामुळे मन अस्वस्थ राहील. बुधामुळे काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख मिळेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी स्वराशीत शुक्र आहे. तो कला क्षेत्रास अनुकुल असला तरी उच्च कलागुण असूनही अधिक प्रगती करणे शक्य होत नाही. तसेच आपले कलागुण जगासमोर प्रकट करण्याची संधीच मिळत नाही. या शुक्राजवळ शुद्ध प्रेमभावना नसते. कामुकता असते. त्यामुळे नुकसान होण्याचीच शक्यता असते. काही कलाकार नैराश्यामुळे व्यसनाधीन होणेही संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती मिळेल. दररोज स्नान झाल्यावर “ शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या षष्ठ स्थानी राहू असून व्ययस्थानी केतू आहे. या केतूमुळे स्वभाव लहरी होणे संभवते. असेच राहूमुळे स्वभाव कावेबाज, धूर्त होणे संभवते. पण या राहूमुळे हितशत्रूंवर विजय मिळवू शकाल. तसेच ज्यांचे अन्य जातिधर्माच्या मंडळींशी मैत्रीचे संबंध आहेत त्यांना अशी मैत्री लाभदायक होईल. पण हा राहू अनारोग्यकारक होण्याची शक्यता दिसते. विशेष करून पोटाचे आजार होण्याची शक्यता आहे. जपा. त्याशिवाय विष भय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे स्वभाव विक्षिप्त झाल्यास घरीदारी कोणाशी पटणार नाही. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि -बुध या राशीच्या चतुर्थ स्थानी हर्षलबरोबर आल्यावर काळ अधिक प्रतिकुल होईल व कुटुंबिक त्रास, अनारोग्य, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे येणे, वाढता खर्च अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल व त्यामुळे काही मंडळींना नैराश्य येईल. पण बुधामुळे काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. पण महिन्याच्या पूर्वार्धात रवि -बुध या राशीच्या तृतीय स्थानी असतील तेव्हा सर्व बाबतीत सुखसमाधान मिळेल. आरोग्य चांगले राहील, नोकरीत विविध प्रकारचे लाभ होतील. पण बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी स्वराशीत असलेल्या शुक्रामुळे विविध प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेचा आनंद व सुखसमाधान मिळू शकेल. या राशीच्या प्रथम स्थानी मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. पैकी मंगळामुळे स्वभाव हट्टी व मानापमान फार असणारा असा घडणे संभवते. त्यामुळे अकारण श्रम, दगदग सहन करावी लागेल. शिवाय हा मंगळ त्याचा शत्रू शनिसह

असल्यामुळे अनारोग्यकारकच होईल. तसेच नोकरीव्यवसायात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. कुटुंबातील कोणाचे स्थलांतर झाल्यामुळे दूरत्व निर्माण झाले तर मन अस्वस्थ होईल. शनीमुळे पतिपत्नीपैकी कोणाच्या तरी अनारोग्याची चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो नीच राशीत असल्याने फारसा अनुकुल होणार नाही. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना थोडासा अनुकुल होईल इतकेच. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर " श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा.

**(११) कुंभ** - या राशीच्या प्रथम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय कोमल झाली असावी, असे वाटते. तसे खरोखरच असेल तर मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहिरे नैराश्य येत असण्याची शक्यता वाटते. या राशीच्या धनस्थानी असलेले रवि -बुध या महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असतील व त्यामुळे वाढत्या खर्चाची आर्थिक चिंता, होणारे आर्थिक नुकसान, घरीदारी होणारे वाद , भांडणे अशापैकी कारणांनी शारीरिक अनारोग्य होणे संभवते. विशेष करून डोळ्याचे दुखणे त्रस्त करीतसे दिसते. बुध ग्रह प्रतिकुल असला तरी काही मंडळींना कमी-अधिक प्रमाणात धनलाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह अनुकुल होईल व घरीदारी सर्व सुखाचेच घडेल. पण बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे किंवा हितशत्रूंचा त्रास होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी स्वराशीत असलेल्या शुक्र ग्रहामुळे गृहसौख्य मिळेल. ज्यांची शेतीवाडी आहे त्यांना त्यापासून भरपूर लाभ होईल. या राशीच्या पंचम स्थानी असलेला राहू विविध कारणांनी संततिसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. पण ज्यांचा दलाली, कमिशनवर व्यवसाय असेल त्यांना मात्र हा राहू लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या लाभस्थानी असलेला केतु अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. पैकी मंगळ व शनि हे दोन्हीही एकमेकांचे शत्रू ग्रह असल्याने अधिकच प्रतिकुल होतील व त्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणे संकटपरंपराच निर्माण होणे संभवते. त्यामुळे या राशीच्या मंडळींनी या काळात सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने, विचारपूर्वक व फसवणूक होणार नाही याची खात्री करूनच करावेत. शनीमुळे काही मंडळींना वातविकाराचे आजार त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच मंगळामुळे उष्णताविकाराचे आजार होणेही संभवते. त्याशिवाय आर्थिक चिंता, वाद, भांडणे, मानहानी होण्याची शक्यताही दिसते. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो नीच राशीत असल्याने फारसा अनुकुल होईलसे दिसत नाही. पण त्याच्यामुळे अध्यात्म, समाजसेवा अशी कार्यक्षेत्रे असणारांना तो अनुकुल होईलसे दिसते. पण तो कौटुंबिक सुखात बाधा आणण्याची शक्यता होते. जपा. श्रद्धा असेल तर श्री शिव शंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे व रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा "चे पठण करा.

**(१२) मीन** - या राशीच्या मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रवि -बुध दोन्ही ग्रह अनारोग्यकारक व मनस्ताप देणारे असल्याचाच अनुभव येईल. रवीमुळे

वाद, भांडणे, मनस्तापदायक घटना घडणे संभवते. आर्थिक चिंता, वाढता खर्च, होणारे आर्थिक नुकसान अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. नोकरी-व्यवसायात पीछेहाट होत असल्याची भावना होईल. काही मंडळींना डोळ्याचा आजार त्रस्त करील; तर काहींना रक्तदाबाचा किंवा हृदयरोगाचा आजार होणे संभवते. पूर्वीपासूनच असे आजार असतील तर अशा मंडळींनी अत्यंत सहनशील बनून मनस्थिती शांत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. बुधामुळे मनस्थिती चंचल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक नुकसान, काही मंडळींना कुसंगतीचा त्रास तर काहींना मित्राशी द्रोह झाल्याचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात अखेरच्या सप्ताहात बुधामुळे धनलाभ होण्याची शक्यता आहे. व्ययस्थानी असलेला नेपच्यूनसुद्धा कसल्या तरी चिंतेमुळे मानसिक व्यग्रता निर्माण करीलसे दिसते. त्यामुळे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या स्वराशीतील शुक्र ग्रहामुळे या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. तसेच काही मंडळींना धनलाभ होईल; तर काही मंडळींना मान, प्रतिष्ठा, भूमिलाभ असं काही मिळण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेला राहू कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी असलेला केतूही या राशीच्या व्यापारी मंडळींना व नोकरदार मंडळींना प्रतिकुल होईल. काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. पण त्यांनी तो मोह आवरावाच. आहे ती नोकरीच सहनशील बनून करावी. या याशीच्या लाभस्थानी मकर राशीत मंगळ -गुरु-शनि असे तीन ग्रह आहेत. मंगळामुळे कष्ट-परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. शिवाय मैत्रीत वितुष्ट निर्माण होणे संभवते. गुरु ग्रह अनुकुल असला तरी तो मकर या त्याच्या नीच राशीत असल्यामुळे काही गोष्टी मनासारख्या घडतील, तर काहींना विवाहयोग येईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना खूप कष्ट-परिश्रमानेच काही प्रमाणात शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. शनि ग्रह साधारण शुभ असला तरी संततिसुखात बाधा निर्माण कारीलसे दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज स्नान झाल्यावर “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====